ISSN: 2249-894X Impact Factor :3.8014(UIF) Volume - 6 | Issue - 1 | October - 2016

Review Of Research

# धर्मश्री : एक धर्मचिंतन

प्रा. किशोर यादवराव बुटले
मराठी विभागप्रमुख, अमोलकचंद महाविद्यालय, यवतमाळ.




**प्रास्ताविक :**

एस. एल. भैरप्पा हे नाव कन्नड साहित्य क्षेत्रात सुपरीचित व मान्यवर असे आहे. त्यांच्या प्रत्येक कादंबरीने सुजान वाचकांच्या मनात एक वेगळे स्थान मिळविले आहे. 'धर्मश्री' या कादंबरीमुळे त्यांची प्रतिभा प्रकाशात आली. मुळात एस. एल. भैरप्पा हे तत्त्वज्ञानाचे अभ्यासक आहेत. सहाजिकच त्यांच्या तत्त्वचिंतनाचा कादंबरी लेखनावर सखोल परीणाम झाला आहे. तत्त्वज्ञान हे वेगवेगळ्या विचारशक्तींच्या माणसांमध्ये कशा वेगवेगळ्या प्रेरणा निर्माण करते आणि या प्रेरणा व्यक्तीच्या जीवनधारा कशा संपूर्ण बदलून टाकतात, याचे दर्शन आपल्याला भैरप्पांच्या धर्मश्री या कादंबरीतून स्पष्टपणे दिसते. एस. एल. भैरप्पा यांनी हिंदू संस्कृतीचा सखोल अभ्यास केला आहे. आनंदकुमार स्वामी ही त्यांची मूळ प्रेरणा. त्यानंतर त्यांनी भारताच्या नवोदयाला कारणीभूत असलेले हॅवेल कजिन, फर्ग्युसन, मॅक्सम्युलर, डॉस्सन वगैरेंच्या लिखाणाचा अभ्यास केला. त्यांच्या या अभ्यासाची झलक या कादंबरीत उठून दिसते.

एका व्याख्यानात ज्ञानपीठ पारीतोषिक विजेते भालचंद्र नेमाडे यांनी म्हटले होते त्याचा मतितार्थ असा होता, ''व्यास वाल्मिकी यांच्यानंतर कालीदास भवभूती यांसारखे संस्कृतमध्ये लेखन करणारे काही लेखक भारतीय लेखकच या उपाधीला प्राप्त ठरतात. याच निकशावर पाहिले असता एस. एल. भैरप्पा हे कन्नड भाषेत लिहीणारे भारतीय लेखक आहेत, असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही.''[१] धर्माचा अभ्यास ही मोठी जटील गोष्ट आहे. ती भैरप्पांनी मोठ्या ताकदीने पेलली आहे. हे त्यांच्या कादंबरीलेखनातून दिसून येते. सार्थ, आवरण यांसारख्या कादंबऱ्यांमधूनही त्यांनी बौद्ध, इस्लाम धर्माबाबतची चर्चा केलेली आहे. मात्र, त्याची सुरूवात 'धर्मश्री' मध्ये झालेली आहे. वयाच्या २२ व्या वर्षी धर्मविषयक चर्चा करणारी कादंबरी लिहिणे, ही खूप मोठी गोष्ट आहे. यासाठी एक वेगळी बौद्धिक क्षमता लागते. भैरप्पांजवळ ती मोठ्या प्रमाणावर आहे. हे त्यांच्या कादंबऱ्यांचे विषय पाहता सहज लक्षात येते. ही कादंबरी म्हणजे त्यांच्या वैचारिक चिंतनाची यशस्वी सुरूवात आहे.

धर्मश्रीच्या लेखनाचा कालखंड हा स्वातंत्र्य मिळून अवघी आठ—नऊ वर्षे झालेला कालखंड आहे. त्यामुळे धर्मविषयक, जातीसंस्थाविषयक तरूण मुलांच्या मनात बराच गोंधळ निर्माण होत होता. धर्मांतराचे, मिशनऱ्यांचे कार्य जोमाने चालू होते. मिशऱ्यांनी तरून वर्गाकडेच आपले लक्ष केंद्रित केले होते. अनेक धर्मांतरित झालेले हिंदूदेखील या कामात मिशनऱ्यांना मदत करत होते. या काळात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्य अत्यंत जोमाने चालू होते. रूढी—परंपरा, कर्मकांड यांमुळे विखुरलेला हिंदू समाज संघटित करण्याचे उदात्त धोरण या संघटनेचे होते. या कादंबरीतील शंकर ही व्यक्तिरेखा संघाच्या सच्चा कार्यकर्त्याची आहे. त्याच्या माध्यमातून भैरप्पांनी आरएसएसच्या कार्याची गरज आणि आणि त्याची कार्यपद्धती या दोन्हींचे निदर्शन केले आहे. त्या काळात या कार्याकडे अनेक तरूण आकर्षिले जात होते. मात्र तरूण वर्ग देशासाठी तन—मन—धन अर्पूण काम करायला सिद्ध झालेला होता. धर्मांतराचा भस्मासूर भारताला गिळू पाहत असताना आरएसएससारख्या संघटनांचे कार्य देशाला मोठा आधार होता. ख्रिश्चन मिशनऱ्यांचे स्लो पॉयझनिंग पद्धतीने धर्मांतराचे प्रयान भारतीय समाजाला स्वधर्मापासून वेगाने दूर करीत होते. गरीब वर्गाला नोकरी, पैसा यांचे अमिष दाखवून त्यांना ख्रिश्चन करून घेण्याचे मिशनऱ्यांचे प्रयत्न ही भारतीय

समाजातील विचारवंतांना चिंतेची बाब वाटत होती. अशा प्रकारची या काळातील स्थितीगती पाहून भैरप्पांनी कादंबरीची रचना केली आहे.

'धर्मश्री' या कादंबरीतील महत्त्वाच्या व्यक्तिरेखा म्हणजे सत्यनारायण, लिली, आणि राचम्मा या तीन व्यक्तिरेखांच्या भोवती कादंबरीची रचना झालेली आहे. भैरप्पांनी धर्म, जातीव्यवस्था, रूढी, परंपरा, मानवी स्वभाव या साऱ्यांचा अतिशय बारकाईने विचार केलेला आहे. या कादंबरीचे महत्त्व सांगताना अंजली जोशी म्हणतात, ''हिंदू धर्माच्या लोकांची मानसिकता, सामाजिक कार्यकर्त्यांची मानसिकता, जनसामान्यांची पुरोगामी विचारांबाबतची मानसिकता, मार्क्सवादी विचारांच्या लोकांची मानसिकता या सर्वांचाही भैरप्पांनी खोलवर जाऊन विचार केला आहे. हे लक्षात येते. हिंदू धर्मातील तरूणाने धर्मांतर करणे, त्याला भोगावे लागलेले सामाजिक, मानसिक परिणाम त्यावर उपाय म्हणजे आर्य समाजी पद्धतीने शुद्धीकरण करून पुन्हा हिंदू धर्मात प्रवेश आणि त्याच्या पत्नीनेही हिंदू धर्मात प्रवेश करणे या घटनांचा भैरप्पांनी एक सुरेख गोफ धर्मश्रीमध्ये तयार केला आहे. त्यामुळे ही कादंबरी वाचकांच्या मनावर सखोल परिणाम करते.''[२] एस. एल. भैरप्पा यांनी केवळ मत मांडले नाही तर त्याचा अवलंब आपल्या कादंबरीतून केलेला दिसून येतो.

'धर्मश्री' या कादंबरीचं महत्त्वाचं वैशिष्ट्य म्हणजे सशक्त व्यक्तिरेखा होय. या व्यक्तिरेखांमुळे कादंबरी वाचकाच्या मनाची पकड घेते. या कादंबरीतील स्त्रिया स्वतंत्र निर्णयशक्ती असणाऱ्या, ठाम राहणाऱ्या अशा असतात. त्यांचा कधी गोंधळ उडत नाही. त्या त्यांच्या जीवनपद्धतीबाबत स्वच्छ विचार करणाऱ्या असतात. तशाच लिली आणि राचम्मा आहेत. त्यांच्या जीवनात सत्यनारायणाचे महत्त्वाचे आणि विशिष्ट स्थान आहे. लिलीचा तो प्रियकर आणि नंतर पती आहे. राचम्माचा तो जीवलग मित्र आहे. या दोघांमधील नाते वेगळ्या बंधाने बांधलेले आहे. त्या नात्याला कोणत्याही चौकटीत बसवता येत नाही. या नात्याचा आदर पती देवदासही करताना दिसले. अशा प्रकारचे मानवी जीवनातील संबंध या कादंबरीचे वैशिष्ट्य ठरले आहे.

एस. एल. भैरप्पा यांच्या 'धर्मश्री' या कादंबरीला कथनाची विशेष अशी जोड आहे. हिंदू तत्त्वज्ञानाची महती सांगताना कुमार स्वामींचा उल्लेख करून भैरप्पा लिहितात, ''हे पाहा, कुमार स्वामींचा दृष्टिकोन हा संपूर्ण हिंदू दृष्टिकोन होता. आताची जी पाश्चिमात्य पद्धत आहे, ती प्रत्येक वस्तूचे विभाजन करू पाहते. माणसाच्या जीवनाचे भाग पाडून बघण्याची त्यांची सवय आहे. कोणतीही गोष्ट संयुक्तपणे पाहणे, हा झाला हिंदू दृष्टिकोन. राष्ट्र म्हणजे राजकारणाच्या अनुकूलतेसाठी केलेला चौकोन नव्हे. त्याला एका परंपरेची, संस्कृतीची, इतिहासाची गरज असते. प्रत्येक देश आपली चेतना आपल्या कला, धर्म आणि जीवनक्रमाद्वारे आपल्या अशा एका विशिष्ट पद्धतीने व्यक्त करतो. ही परंपरा बाजूला सारून जर दुसराच मार्ग देशाने पत्करला तर मग त्या गोष्टींना राष्ट्रीय असे म्हणता येणार नाही. राजकीय स्वातंत्र्य हे या परंपरेच्या उभारणीला आवश्यक अशी एक स्थिती आहे.''[३]

द. दि. पुंडे यांनी 'धर्मश्री' या कादंबरीबद्दलच्या अभिप्रायात म्हटले की, ''मराठी वाचकांना भैरप्पांच्या वाचनाचा कंटाळा आलेला नाही. 'आता पुरे!' असे मराठी वाचक भैरप्पा यांना जणू म्हणूच शकत नाहीत. उलट प्रत्येक वेळी मराठी वाचक अतिशय कुतूहलाने नवीनतम जिज्ञासेने भैरप्पांची कादंबरी हातात घेतो आणि मनोमन तिला दादही देतो. याचे कारण लक्षात येणारे एक वैशिष्ट्य म्हणजे भैरप्पा हे जरी मूलत: कन्नड कादंबरीकार असले तरी रूढार्थाने ज्याला 'प्रादेशिक' म्हणतात तशा स्वरूपाची कादंबरी लिहिण्याचा त्यांचा पिंड दिसत नाही. उलट ते सतत 'भारतीय कादंबरी'च लिहित आलेले आहेत.''[४]

याबरोबरच एस. एल. भैरप्पा यांच्या साहित्याचा सखोल अभ्यास करून मराठी साहित्य विश्वाला अनुवादातून ओळख करून देणाऱ्या उमा कुलकर्णी यांचाही अभिप्राय तितकाच महत्त्वाचा आहे. त्या म्हणतात, ''सर्व भारतीय भाषांमध्ये भैरप्पांचे लेखन बहुसंख्य वाचकांपर्यंत पोहचत असलेलं दिसतं. त्यामागे काही कारणं आहेत. भैरप्पा आपल्या लेखनातून जे विषय मांडतात, हे भारतीय मनाला भिडणारे असतात. त्यातून व्यक्त होणारी मूल्ये, संवेदना एकीकडे आधुनिक असली तरी ती आजच्या भारतीय मनाच्या जवळवची असतात. तसेच भारतीय मनाला असणाऱ्या रससिद्धांताशी या साहित्यातून निर्माण होणाऱ्या रसनिर्मितीचा थेटच संबंध असतो.''[५]

## समारोप :

तत्त्वज्ञान हे वेगवेगळ्या विचारशक्तिच्या माणसामध्ये कशा वेगवेगळ्या प्रेरणा निर्मान करते आणि या प्रेरणा व्यक्तिच्या जीवनधारा पुर्णपने कशा बदलून टाकतात याचे दर्शन 'धर्मश्री' या कादंबरीत एस. एल. भैरप्पा मांडतात. हिंदु संस्कृतीचा भैरप्पांचा असलेला सखोल असा अभ्यास या कादंबरीतून दिसतो. धर्मश्रीचा कालखंड हा स्वातंत्र्यानंतरचा कालखंड आहे. स्वातंत्र्यानंतर तरून मुलांच्या मनातील गोंधळ, जातीसंस्थाविषयक, धर्मविषयक मतमतांतरे, धर्मांतराचे चालू असलेले कार्य, मिशनऱ्यांचा वाढलेला प्रभाव आणि या प्रभावातून धर्मांतर होऊन विभागलेला समाज, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे चालू असलेले कार्य, हिंदू धर्माची स्थिती, ख्रिश्चन धर्माचे झालेले आक्रमन इत्यादी पार्श्वभूमीवर 'धर्मश्री' कादंबरीची एस. एल. भैरप्पा यांनी मांडणी केलेली आहे. स्थुलमानाने स्वातंत्र्यानंतरची एका गोंधळलेल्या समाजासामोर निर्मान झालेला विचारसरणीचा प्रश्न, त्यातुन विभागत असलेला समाज या सर्व गोष्टी स्वातंत्र्योत्तर भारतामध्ये घडत होत्या. या प्रश्नांची चर्चा कादंबरीचा विषय आहे.

**संदर्भग्रंथ :**

**१.** तत्रैव, पृ. ३४
२. रेवनकर विजयालक्ष्मी (अनु.), 'धर्मश्री' (मूळ ले. एस. एल. भैरप्पा), कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती, जून २००५, पृ. ८
३. तत्रैव, पृ. २२१
४. कुलकर्णी उमा (अनु.), (संपा.), 'भैरप्पा साहित्य मराठी समीक्षा', पृ. १३
५. कुलकर्णी उमा (अनु.), 'माझे नाव भैरप्पा', (मूळ ले. एस. एल. भैरप्पा), राजहंस प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती ऑगस्ट २०१४ पृ. २६६